नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर

प्रशांतनगर, एम.जी.रोड, विष्णुनगर, ठाणे (प.) -४००६०२

संपर्क :०२२२५४२३३००

ई–मेल:cp.thane.naupada@mahapolice.gov.in

वेबसाईट:–www.thanepolice.gov.in

जा.क्र./नौपाडा पो ठाणे/ठाणे/ /२०२६ दिनांक :– १३/०७/२०२६

घरफोडीतील अट्टल व सराईत आरोपीतास अटक करुन रोख रक्कम व मोबाईल हस्तगत करुन ०६ गुन्हे उघडकीस आणले बाबत...

दिनांक ११/०७/२०२५ रोजी फियादी नामे विक्रम लालासो राठोड यांनी फिर्याद दिली की, त्यांचे नाद मेन्स वेअर या दुकानाचा कडीकोयंडा उचकटुन घरफोडी करुन, त्यांचे दुकानातील रोख रक्कम चोरी केली आहेत. फिर्यादी यांनी वरील प्रमाणे फिर्याद दिल्याने नौपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं. २१०/२०२५ भा.न्या. सं. कलम ३०५ अ,३३१(३),३३१(४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास सपोनि मंगेश भांगे हे करीत असुन मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १, श्री.बाळासाहेब पाटील, मा.सहा.पोलीस श्री.आयुक्त संभाजी जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.योगेश आव्हाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय दवणे,पोनि प्रशासन श्री लक्ष्मण राठोड यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तपासी अधिकारी यांनी तपास चालु केला होता.

आरोपीचा शोध घेण्यासाठी व पोहवा/ गोलवड व पोशि/कांगणे यांनी घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता सदर आरोपीने यापुर्वी देखीली ठाणे शहरामध्ये घरफोडी केल्याचे लक्षात आले. त्यानंतर ठाणे शहर ते टिटवाळा मार्गावरील सुमारे १५० हुन अधिक सी.सी. टी. व्ही. फुटेज तपासले असता सदर आरोपी हा ठाणे स्टेशन येथुन लोकल ने प्रवास करीत असल्याचे लक्षात आले व पोलीसांना गुंगारा देणे करीता वारंवार लोकल बदलुन येणा-या प्रत्येक स्टेशनवर उतरत असे. त्यामुळे आरोपीस शोधणे कठीण झाले होते. आरोपीचे यापुर्वी प्राप्त सी सी टी व्ही फुटेज व इतर तांत्रिक तपासावरुन पोलीसांना त्यांचे गोपनिय बातमीदारमार्फत अशी बातमी मिळाली की, आरोपी हा खडवली गावामध्ये एका चाळीमध्ये भाडयाने रुम करुन राहत आहे. सदर ठिकाणी गेले असता आरोपीने पोलीसांना पाहुन तेथुन पळुन जात असताना सपोनि भांगे व पोहवा/ईशवर गोलवड,पोहवा/विलास देसाई ,पोना सुनिल धोंडे, पोशि सारंग कांगणे, यांचे पथकाने त्याचा पाठलाग करुन आरोपी नामे **सुरज रामदास चौव्हाण ,वय ३० वर्षे,रा.मधुकर बजगे यांची चाळ,रुम नंबर १,जांभुळपाडा,खडवली गाव,टिटवाळा,ठाणे मुळ रा.बिदानपल्ली,नदिया,प.बंगाल** यास घरफोडीच्या घातक हत्यारासह शिताफीने ताब्यात घेवुन त्यास सदर गुन्हयाकामी दि. ११/०७/२०२६ रोजी अटक केली आहे. आरोपीस मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्याची दिनांक १३/०७/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केलेली होती. आरोपीस ताब्यात घेतल्यानंतर त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली.

तसेच आरोपीकडे पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या तपासामध्ये आरोपीने मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरास बंद दुकाने फोडुन चो-या केले असल्याची कबुली दिली आहे. आरोपी हा कपडयाचे ,मोबाईलचे , वाईन शॉप व इतर दुकाने फोडुन चो-या करीत असे व त्यातुन मिळालेल्या रोख रक्कमेवर मौज मजा करुन सदर रक्कम संपताच पुन्हा चो-या करीत असे

अटक आरोपीकडुन तपासा दरम्यान <u>६५,०००/- रोख रक्कम, मोबाईल, घराफोडीचे हत्यारे</u> असा मुददेमाल हस्तगत करुन त्याचे कडुन खालील प्रमाणे ६ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.

१) नौपाडा पो स्टे गु.र.नं.२१०/२०२६ बी एन एस क.३०५,३३१(३)

२) नौपाडा पो स्टे गु.र.नं. ६८/२०२६ बी एन एस क ३०५ (अ),३३१ (३),३३१(४)

३) नौपाडा पो स्टे गु.र.नं.११३/२०२६ बी एन एस क.३०५(अ),३३१ (३),३३१(४)

४) नौपाडा पो.स्टे.गु.र.नं. ११४/२०२६ बी एन एस कलम ३०५(अ),३३१ (३) (४)

५) ठाणेनगर पो स्टे गु.र.नं. ११६/२०२६ बी एन एस कलम. ३०५(अ),३३१ (३) (४)

६) ए पी एम सी पो स्टे नवी मुंबई गु.र.नं.३३२/२०२६ बीएनएस क.३०५,३३१(३),३३१(४)

आरोपी हा रेकॉर्ड वरील आरोपी असुन त्याचा पुर्वइतिहास खालील प्रमाणे आहे.

१) डोंबिवली पो.स्टे.गु.र.नं.१८०/२०२१ भा.द.वि.क.३८०
२) तुळींज पो.स्टे.गु.र.नं.८१२/२०१८ भा.द.वि.क.४५७,३८०,३४
३) पायधुणी पो.स्टे.गु.र.नं.२४२/२०१५ भा.द.वि.क.३७९
४) डोंबिवली पो.स्टे.गु.र.नं.१३३/२०२१ भा.द.वि.क.४५४,३८०

सदर कामगिरी हि मा. पोलीस उप आयुक्त,परि.१ श्री.बाळासाहेब पाटील, मा. सहा.पोलीस आयुक्त श्री.संभाजी जाधव नौपाडा विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.योगेश आव्हाड, पोनि (गुन्हे) श्री.संजय दवणे, पोनि लक्ष्मण राठोड (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी सपोनि / मंगेश भांगे,, पोहवा/६३३४ गोलवड, पोशि/७६९५ सारंग कांगणे पोहवा/४६९६ देसाई,पोहवा/ सुनिल धोंडे, पोहवा/६४६५ तडवी, पोहवा/२८५ गायकवाड, पोहवा/७२६१ माळी,पोहवा/रांजणे, पोशि/२५५६ तिर्थकर ,पोशि/उभे , पोशि/प्रमोद शिंदे यांनी केलेली आहे.
